20190306154300630S

10

विक्रीकर सहआयुक्त संवर्गाची
दि. ०१ जानेवारी २०१२ पर्यंतची स्थिती
दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासूची

**महाराष्ट्र शासन**

वित्त विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक :- विगोप-१४१४/प्र.क्र.३९/विक्रीकर (प्रशासन - ३)

मंत्रालय, मुंबई - ४००० ३२

दिनांक : २६ जून, २०१५

वाचा :- १. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही/२०११/प्र.क्र.२८४/१२, दि.२१.१०.२०११

२. शासन परिपत्रक क्र.विगोप १४१४/प्र.क्र.१३/विप्र-३, दि.०३.१२.२०१४ अन्वये प्रसिध्द केलेली दि.०१.०१.२०११ पर्यंतची स्थिती दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासूची

३. शासन परिपत्रक क्र. विगोप १४१४/प्र.क्र.३९/वि.प्र.-३, दि.२३.१२.२०१४ अन्वये प्रसिध्द केलेली दि.०१.०१.२०१२ ते ०१.०१.२०१४ पर्यंतची स्थिती दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासूची

४. शासन परिपत्रक क्र. विगोप १४१४/प्र.क्र.३९/वि.प्र.-३, दि.३०.०५.२०१५ अन्वये प्रसिध्द केलेली दि.०१.०१.२०१२ पर्यंतची स्थिती दर्शविणारी तात्पुरती ज्येष्ठतासूची

५. विशेष विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.एएसी २०१४/आस्था-२/गोप/विउआ/ज्येष्ठता, दि.२३.०६.२०१५.

**-: परिपत्रक :-**

१. माननीय सर्वोच्च न्यायालयाने विक्रीकर कार्यालयातील विक्रीकर निरीक्षक संवर्गाच्या ज्येष्ठतासूची बाबत दिनांक १२.०१.२००० रोजी निकाल दिला. त्या निकालानुसार विक्रीकर कार्यालयाने १९७२ पासूनच्या विक्रीकर निरीक्षकांच्या ज्येष्ठतायाद्या व त्या अनुषंगाने ज्येष्ठ विक्रीकर निरीक्षकांच्या ज्येष्ठतायाद्या सुधारीत केल्या. सदर ज्येष्ठतायादीच्या अनुषंगाने विक्रीकर अधिकारी वर्ग-२ संवर्गाच्या सन १९७४-७५ पासूनच्या निवडसूच्या, तसेच विक्रीकर अधिकारी वर्ग-१ संवर्गाच्या ज्येष्ठतासूचीबाबत मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण व मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निकाल विचारात घेवून विक्रीकर अधिकारी वर्ग-१ संवर्गाच्या सन १९८२-८३ ते २०११-१२ या कालावधीच्या निवडसूच्या सुधारित करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने विक्रीकर उपआयुक्त संवर्गाच्या सन १९८२-८३ ते १९९२-९३ या कालावधीच्या निवडसूच्या सुधारित करुन त्यास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता प्राप्त करुन घेण्यात आली आहे. त्यापुढील सन १९९३-९४ ते २०१०-११ या कालावधीच्या निवडसूच्यांना सामान्य प्रशासन विभागाने मान्यता दिली आहे. त्या विचारात घेऊन विक्रीकर उप आयुक्त (नवीन पदनाम विक्रीकर सहआयुक्त) संवर्गाच्या सन १९९३-१९९४ ते २००२-२००३ या कालावधीच्या निवडसूच्यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता मिळाली आहे. त्यापुढील सन २००३-०४ ते २००८-०९ या कालावधीतील निवडसूच्यांना सामान्य प्रशासन विभागाने मान्यता दिली आहे. आता त्यापुढील सन २००९-१० ते २०१०-११ या कालावधीच्या निवडसूच्यांना सामान्य प्रशासन विभागाने मान्यता दिली आहे. त्यापैकी सन २००९-१० या वर्षाची निवडसूची तयार करण्यात आलेली नाही.

२.	संदर्भ क्र.२ नुसार विक्रीकर कार्यालयातील विक्रीकर उपआयुक्त (नवीन पदनाम विक्रीकर सह आयुक्त) संवर्गाची दि.०१ जानेवारी २००५ ते दि.०१ जानेवारी २०११ पर्यंतची स्थिती दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात आली आहे. संदर्भ क्र.३ नुसार विक्रीकर कार्यालयातील विक्रीकर उपआयुक्त (नवीन पदनाम विक्रीकर सह आयुक्त) संवर्गाची दि.०१ जानेवारी २०१२ ते दि.०१ जानेवारी २०१४ पर्यंतची स्थिती दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२१ ऑक्टोंबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३.३ (ड) नुसार ०१.०१.२०११ रोजीची एकत्रित ज्येष्ठतासूची तयार केल्यानंतर दि.०१.०१.२०१२ रोजीची व त्यापुढील ज्येष्ठतासूचीबाबतची कार्यवाही प्रत्येक वर्षी करणे बंधनकारक आहे त्यामुळे विक्रीकर सहआयुक्त संवर्गाची दि.०१.०१.२०१२ ची स्थिती दर्शविणारी ज्येष्ठतासूची संदर्भ क्र.४ नुसार पुन्हा तात्पुरत्या स्वरुपात प्रसिध्द करण्यात आली होती. या ज्येष्ठतासूचीस कोणत्याही अधिकाऱ्याने आक्षेप घेतलेला नाही.

३.	सन २००९-१० ते २०१०-११ या निवडसूचीतील अधिकाऱ्यांची नावे अंतर्भुत करुन विक्रीकर सहआयुक्त संवर्गाची दि.०१ जानेवारी २०१२ पर्यंतची स्थिती दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासूची यासोबत परिशिष्ट-अ नुसार प्रसिध्द करण्यात येत आहे. त्यापैकी सन २००९-१० या वर्षाची निवडसूची तयार करण्यात आलेली नाही. सदर ज्येष्ठतासूची या परिपत्रकासोबत जोडण्यात आली आहे.

४.	विक्रीकर उप आयुक्त (नवीन पदनाम विक्रीकर सहआयुक्त) पदावरील अधिकाऱ्यांची वरील प्रमाणे ज्येष्ठतासूची तयार करताना सहायक विक्रीकर आयुक्त (नविन पदनाम विक्रीकर उपआयुक्त) संवर्गाची दि.०६.०४.२०१५, २८.०५.२०१५ व विक्रीकर अधिकारी वर्ग-१ (नवीन पदनाम सहायक विक्रीकर आयुक्त ) संवर्गाची दि.२१.०८.२०१२ रोजी प्रसिध्द केलेली अंतिम ज्येष्ठतासूची विचारात घेण्यात आली आहे.

५.	विक्रीकर उपआयुक्त (नवीन पदनाम विक्रीकर सहआयुक्त) पदावरील ज्येष्ठतासूची पुढील अटींच्या अधिन राहून अंतिम स्वरुपात प्रसिध्द करण्यात येत आहे :-

अ) सदर ज्येष्ठतासूची संबंधीत अधिकाऱ्याच्या विक्रीकर उपआयुक्त (नवीन पदनाम विक्रीकर सहआयुक्त) पदावरील सन २००९-१० ते सन २०१०-११ या कालावधीच्या निवडसूच्यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता मिळण्याच्या अधिन राहून प्रसिध्द करण्यात येत आहेत. यापैकी सन २००९-१० ची निवडसूची तयार करण्यात आलेली नाही.

ब) ज्या अधिकाऱ्यांचे जातीप्रमाणपत्राच्या पडताळणी अभावि किंवा अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित/प्रलंबित आहे या कारणास्तव नियमित पदोन्नतीचे आदेश अद्याप निर्गमित केलेले नाहीत, अशा अधिकाऱ्यांची नावे या ज्येष्ठतासूचीत समाविष्ट केलेली नाहीत. त्यांचे नियमित पदोन्नतीचे आदेश निर्गमित झाल्यानंतर त्यांचा ज्येष्ठतासूचीत यथास्थिती समावेश करण्यात येईल.

क) श्री.बी.टी देशमुख यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेली रिट याचिका क्र. ६४८९/२००० वरील निर्णयाच्या अधीन राहून सदर ज्येष्ठतायादी अंतिम स्वरुपात प्रसिध्द करण्यात येत आहे.

ड) विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये दिलेल्या निर्णयानुसार कनिष्ठ संवर्गाच्या ज्येष्ठतेत झालेला बदल विचारात घेऊन ज्येष्ठताक्रम निश्चित करण्यात आलेला आहे. ही ज्येष्ठता यादी विक्रीकर विभागातील ज्येष्ठतेसंदर्भात न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिकांवरील निर्णयाच्या अधिन राहुन अंतिम स्वरूपात प्रसिध्द करण्यात येत आहे.

इ) ज्येष्ठतायादी तयार करतांना महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनिमय) नियमावली १९८२ मधील नियम विचारात घेवून अधिकाऱ्याची ज्येष्ठता, निवडसूचीतील क्रमांकानुसार तयार करण्यात आली आहे. म्हणजेच जे अधिकारी पूर्वीच्या मूळ निवडसूचीनुसार विक्रीकर उप आयुक्त (नवीन पदनाम विक्रीकर सहआयुक्त) पदावर पदोन्नत झालेले आहेत, परंतू सूधारित निवडसूचीनुसार योग्य त्या निवडसूचीत समावेश झालेले आहेत त्या वर्षीच्या निवडसूचीतील ज्येष्ठता क्रमानुसार नांवे निश्चित करण्यात आलेली आहेत. तसेच त्यांच्या नावासमोर नमूद केलेला दिनांक हा शासन अधिसूचना साप्रवि, क्र. एस.आर.व्ही.१०७६/१२ दि.२१ जून १९८२ नुसार फक्त विक्रीकर उप आयुक्त पदावरील (नविन पदनाम विक्रीकर सहआयुक्त) ज्येष्ठतेसाठी धरण्यात येईल. इतर कोणत्याही आर्थिक लाभांसाठी तो दिनांक गृहीत धरला जाणार नाही.

६. विक्रीकर आयुक्तांनी ही ज्येष्ठतायादी सर्व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्याची कार्यवाही करावी व सर्व अधिकाऱ्यांनी नोंद घेतल्याची पोच पावती त्यांच्या कार्यालयात ठेवावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(य.द. देशकर)
अवर सचिव, वित्त विभाग.

प्रत,

१) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विक्रीकर विभागातील सर्व अपर विक्रीकर आयुक्त.
३) विक्रीकर उपआयुक्त (जनसंपर्क) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) सर्व संबंधित अधिकारी , विशेष विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मार्फत
५) कार्यासन अधिकारी, वि.प्र.१, २ मंत्रालय, मुंबई.
६) निवडनस्ती वि.प्र. ३.

## परिशिष्ट-अ

वित्त विभाग परिपत्रक क्र. विगोप १४१४/प्र.क्र.३९/विप्र-३, दि. २६/०६/२०१५

विक्रीकर सह आयुक्त संवर्गाची दि.०१.०१.२०१२ रोजीची स्थिती दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासूची.

| ज्येष्ठता क्रमांक | | अधिकाऱ्यांचे नाव | प्रवर्ग | जन्मदिनांक | विक्रीकर सहआयुक्त पदावरील नियुक्ती दिनांक | नियुक्ती प्रकार | ज्येष्ठतेसाठी समायोजनाचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ६ | ५ | ७ | ८ |
| १ | श्री. | ए.व्ही. पातुरकर | खुला | ०५.०४.५३ | ३१.०७.९९ | प | ३१.०७.९९ | |
| खंड दि.०१.०१.२००१ ते ३१.१२.२००१ (दि.०१.०१.२००२ ची स्थिती) | | | | | | | | |
| | | निरंक | | | | | | |
| खंड दि.०१.०१.२००२ ते ३१.१२.२००२ (दि.०१.०१.२००३ ची स्थिती) | | | | | | | | |
| २ | श्री. | एम.ए.आय. सय्यद | खुला | २१.०४.५३ | ०१.०४.०२ | प | २६.०३.०२ | |
| ३ | श्री. | डी.बी. देशमुख | खुला | १०.११.५३ | २६.०३.०२ | प | २६.०३.०२ | |
| खंड दि.०१.०१.२००३ ते ३१.१२.२००३ (दि.०१.०१.२००४ ची स्थिती) | | | | | | | | |
| ४ | श्री. | आर.वाय. मंडपे | खुला | २६.०१.५३ | ०१.०१.०३ | प | ०१.०१.०३ | |
| खंड दि.०१.०१.२००४ ते ३१.१२.२००५ (दि.०१.०१.२००५ ते ०१.०१.२००६ ची स्थिती) | | | | | | | | |
| | | निरंक | | | | | | |
| खंड दि.०१.०१.२००६ ते ३१.१२.२००७ (दि.०१.०१.२००७ ते ०१.०१.२००८ ची स्थिती) | | | | | | | | |
| ५ | श्री. | एस.ए.के.एस. काझी | खुला | २५.०१.५४ | ०२.११.०७ | प | ०२.११.०७ | |
| ६ | श्री. | एस.व्ही. ठाकरे | खुला | २५.०१.५४ | ०२.११.०७ | प | ०२.११.०७ | |
| ७ | श्री. | डी.के. खैरनार | खुला | ०४.०९.५३ | ०२.११.०७ | प | ०२.११.०७ | |
| ८ | श्री. | पी.आर. गंगमवार | खुला | २२.०५.५४ | ०२.११.०७ | प | ०२.११.०७ | |
| ९ | श्री. | एस.के. मोरे | अ.जा. | १२.०१.५३ | १७.०८.०७ | प | ०२.११.०७ | |
| १० | श्री. | आर.बी. जाधव | अ.ज. | १२.१२.५४ | ०२.११.०७ | प | ०२.११.०७ | |
| ११ | श्री. | आर.बी. गवई | अ.जा. | ०९.०६.५४ | ३१.०७.०८ | प | ०२.११.०७ | |
| १२ | श्री. | अे.डी. व्हटकर | अ.जा. | ३१.०१.५३ | ०२.११.०७ | प | ०२.११.०७ | |
| खंड दि.०१.०१.२००८ ते ३१.१२.२०१० (दि.०१.०१.२००९ ते ०१.०१.११ ची स्थिती) | | | | | | | | |
| १३ | श्री. | एस.जी. मोहिते | खुला | ०७.०५.५५ | ०२.११.०७ | प | ०२.११.०७ | |
| १४ | श्री. | पी.डी. गावंडे | खुला | १७.०३.५३ | ३१.०७.०८ | प | ३१.०७.०८ | |
| १५ | श्री. | के.के. गोहोकर | खुला | ०६.१०.५४ | ३०.०४.१० | प | ३१.०७.०८ | |
| १६ | श्री. | डी.जे. चन्ने | खुला | ०५.०२.५४ | ३०.०४.१० | प | ३१.०७.०८ | |
| १७ | श्री. | एस.एस.आर. अबिदी | खुला | १५.११.५५ | ३०.०४.१० | प | ३१.०७.०८ | |
| १८ | श्री. | एस.जी. मोराळे | भज-ड | २८.०७.६३ | ३०.०४.१० | प | ३१.०७.०८ | |
| १९ | श्रीम. | अरुणा धर्माजी जगीयासी | अ.जा. | १०.०५.५६ | ३१.०७.०८ | प | ३१.०७.०८ | |
| २० | श्री. | यु.आर. तिवारी | खुला | १८.०४.५४ | ०८.०७.१० | प | ०८.०७.१० | |
| २१ | श्री. | आर.ए. हरपाळे | इमाव | ०९.१२.५४ | ०८.०७.१० | प | ०८.०७.१० | |
| २२ | श्री. | एम.एम.एन. निझामुद्दीन | खुला | २७.०३.५५ | ०८.०७.१० | प | ०८.०७.१० | |
| २३ | श्री. | ए.वाय. पाठक | खुला | १७.१०.५६ | ०८.०७.१० | प | ०८.०७.१० | |
| २४ | श्री. | ए.बी. कणसे | खुला | २१.०१.५३ | ०८.०७.१० | प | ०८.०७.१० | |
| २५ | श्री. | एम.एम. तेलंग | खुला | १२.०२.५५ | ०८.०७.१० | प | ०८.०७.१० | |
| २६ | श्री. | ए.बी. नडंगे | भज-ब | ११.०९.५३ | १४.०८.०७ | प | ०८.०७.१० | |
| २७ | श्री. | पी.बी. दांडगे | इमाव | १४.१०.५४ | ०८.०७.१० | प | ०८.०७.१० | |
| २८ | श्री. | जी.बी. इंदुरकर | खुला | ०३.०४.५८ | ०८.०७.१० | प | ०८.०७.१० | |
| २९ | श्रीम. | चित्रा व्ही. कुलकर्णी | खुला | १२.०८.६५ | १५.०९.१० | प | १५.०९.१० | |
| ३० | श्री. | व्ही.एस. इंदलकर | खुला | १६.०३.६२ | १५.०९.१० | प | १५.०९.१० | |
| ३१ | श्री. | डी.एच. मांढरे | खुला | ०२.०६.६१ | १५.०९.१० | प | १५.०९.१० | |
| ३२ | श्री. | एल.के. गिरी | भज-ब | १२.१२.५९ | १५.०९.१० | प | १५.०९.१० | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३३ | श्री. | ओ.सी. भांगडीया | खुला | ०५.०१.६२ | १५.०९.१० | प | १५.०९.१० | |
| ३४ | श्री. | व्ही.व्ही. गुठे | भज-ड | ०१.०६.५८ | १५.०९.१० | प | १५.०९.१० | |
| ३५ | श्री. | एच.वाय. गाढेकर | अ.जा. | १०.०८.५६ | १५.०९.१० | प | १५.०९.१० | |
| ३६ | श्री. | ए.एच. राठोड | विजा-अ | ०५.०९.५९ | ३१.१२.११ | प | १५.०९.१० | |
| ३७ | श्री. | एम.एम. कोकणे | भज-क | ०४.०४.६२ | १५.०९.१० | प | १५.०९.१० | |
| ३८ | श्री. | व्ही.यु. बोरसे | भज-क | ०१.०२.६० | १५.०९.१० | प | १५.०९.१० | |
| खंड दि.०१.०१.२०११ ते ३१.१२.२०११ (दि.०१.०१.२०१२ ची स्थिती) | | | | | | | | |
| ३९ | श्री. | एम.व्ही.महाजन | खुला | ११.०८.६० | १५.०९.१० | प | ३१.१२.११ | |
| ४० | श्री. | एस. डी .टिळेकर | इ मा व | २७.०१.६२ | ३१.१२.११ | प | ३१.१२.११ | |
| ४१ | श्री. | डी. बी. काप्रतवार | खुला | ०३.०७.५९ | ३१.१२.११ | प | ३१.१२.११ | |
| ४२ | श्री. | एस. पी. काले | खुला | ०७.०३.६३ | ३१.१२.११ | प | ३१.१२.११ | |
| ४३ | श्री. | पी. के. अग्रवाल | खुला | २८.०८.६० | ३१.१२.११ | प | ३१.१२.११ | |
| ४४ | श्री. | डी. एम. थोरात | खुला | १६.१२.६२ | ३१.१२.११ | प | ३१.१२.११ | |
| ४५ | श्री. | के. डी. पाटील | खुला | ११.११.५८ | ३१.१२.११ | प | ३१.१२.११ | |
| ४६ | श्री. | एस. जी. शेख | खुला | १०.०७.६४ | ३१.१२.११ | प | ३१.१२.११ | |
| ४७ | श्री. | आर. आर. पाटील | खुला | ०१.०६.६१ | ३१.१२.११ | प | ३१.१२.११ | |
| ४८ | श्री. | सी. एम. कांबळे | अ.जा. | २४.०९.६२ | ३१.१२.११ | प | ३१.१२.११ | |
| ४९ | श्री. | एच. ए. बाखरे | अ.जा. | ०५.०७.६१ | ३१.१२.११ | प | ३१.१२.११ | |
| ५० | श्री. | एस. के. दवणे | अ.जा. | ०१.०३.५६ | ३१.१२.११ | प | ३१.१२.११ | |
| ५१ | श्री. | एस. एन. माने | अ.जा. | १२.१०.५७ | ३१.१२.११ | प | ३१.१२.११ | |
| ५२ | श्री. | के. डी. डगळे | अ.ज. | ०१.०८.५७ | ३१.१२.११ | प | ३१.१२.११ | |
| ५३ | श्री. | बी. पी. भालचिम | अ.ज. | ०१.०६.६० | ३१.१२.११ | प | ३१.१२.११ | |
| ५४ | श्री. | एम.आर. कोटनाके | अ.ज. | ०१.०७.६० | ३१.१२.११ | प | ३१.१२.११ | |
| ५५ | श्री. | ए.एस.हांडे | विमाप्र | ०६.०६.५७ | ३१.१२.११ | प | ३१.१२.११ | |